



दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शुक्रवार ८ नोव्हेंबर २०२४ | अंक ३३३० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# पांढरे सोने असलेल्या कापसाची मोठी आवक, दर मात्र कमी शेतकऱ्यांसमोर पुन्हा नवीन संकट



## यंदा कापसाचे नुकसान, जास्त दराची अपेक्षा

नैसर्गिक आपत्तीनंतर उरलेल्या कापसाला चांगला भाव मिळेल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. दसऱ्यापासूनच बाजारात बागायती कापूस दाखल झाला. परतीच्या पावसाने झोडपल्यामुळे कापसाचे आणखी नुकसान झाले. त्यामुळे शेतातून येईल तसा कापूस साठविण्याऐवजी थेट बाजारात विक्रीसाठी शेतकरी आणत आहे. त्याचा फायदा घेत अनेक ठिकाणी व्यापाऱ्यांकडून दर कमी दिला जात आहे.

## हमीभाव पेक्षा कमी भाव

केंद्र सरकारने २०२४-२५ साठी कापसाच्या हमीभावात ५०१ रुपयांची वाढ केली आहे. चालू हंगामात मध्यम धाग्याच्या कापसासाठी ७ हजार १२१ रुपये आणि लांब धाग्याच्या कापसासाठी ७ हजार ५२१ रुपय हमीभाव जाहीर केला आहे. परंतु खासगी व्यापारी त्यापेक्षा कमी दर देत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. राज्यात यंदा सरासरी कापसाचे उत्पादन समाधानकारक झाले आहे. कापसाला मिळणारा दर अजूनही समाधानकारक नाही. यामुळे शेतकऱ्यांनी कापसाची साठवणूक केली आहे. परंतु काही छोट्या शेतकऱ्यांना पैशांची गरज असल्यामुळे कापूस विकावा लागत आहे. खान्देश, विदर्भात कापसाचे उत्पादन सर्वाधिक आहे. त्या भागात जिनिंग मील मोठ्या प्रमाणावर आहे. परंतु दर मिळत नसल्याने शेतकरी नाराज आहेत.

राज्यातील अनेक भागात कापसाचे मोठे उत्पादन आहे. कापूस पीक अनेक वेळा शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरलेले आहे. यामुळेच कापसाला पांढरे सोने म्हटले जाते. दिवाळीच्या निमित्ताने कापसाची खासगी बाजारपेठेत आवक वाढली आहे. राज्यात यंदा सरासरी कापसाचे उत्पादन समाधानकारक झाले आहे. कापसाला मिळणारा दर अजूनही समाधानकारक नाही. यामुळे शेतकऱ्यांनी कापसाची साठवणूक केली आहे. परंतु काही छोट्या शेतकऱ्यांना पैशांची गरज असल्यामुळे कापूस विकावा लागत आहे. कापूस खरेदीसाठी व्यापाऱ्यांची ग्रामीण भागात लगबग दिसून येत आहे. केंद्राचे हमीभाव ७ हजार रुपये आहे. मात्र, कापसाच्या खासगी बाजारपेठेत कापसाचे दर उतरले आहे. खासगी व्यापारी कापसाला ६८०० ते ७ हजार भाव मिळत आहे. शेतकऱ्यांना हमी भावापेक्षा कमी दराने कापूस विकावा लागत आहे. परंतु आंतरराष्ट्रीय वायदे बाजारात कापसाचे दर वाढले आहे. वायदे बाजारात मागील आठवड्यात ७२.३४ सेंट प्रति पौंडवर कापसाचे दर होते. ते आता ७२.६९ सेंट प्रति पौंडवर गेले आहे. त्यामुळे देशातील बाजारपेठेतही कापसाचे दर वाढणार आहे.

## बीड मतदार संघाचा विकास उजेडात आणण्यासाठी ज्योतीताईच्या बॅटरीला निवडून देण्यासाठी जनता सरसावली





बीड- दि 07 (वार्ताहर) बीड विधानसभा मतदारसंघ निवडणुकाची रणधुमाळी सुरू असताना दिवसेदिवस ज्योतीताई मेटे यांना चांगला प्रतिसाद मिळत असताना दिसून येते आहे, आज शिरूर तालुक्यातील औरंगपूर आर्वी जांब शिरापूर गात , पोंडुळ 1,2,3, कमळेश्वर धानोरा लिंबा , खांबा, खलापुरी या बीड मतदार संघातील गावात जन आशीर्वाद दौरा झाला या वेळी, बीड मतदार संघातील विकास उजेडात आणण्यासाठी ज्योतीताईंच्या बॅटरीला निवडून आणण्यासाठी मतदार सरसावले असल्याचे दिसून येत आहे या वेळी महिलांची मोठी उपस्थीती होती. बीड मतदार संघात डॉ. ज्योती मेटे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून मतदार संघातील गावोगावी त्यांनी जन आशीर्वाद प्रचार दौरे सुरू के ले आहेत. या प्रचार दौऱ्यात त्यांना मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत असून डॉ. मेटे यांचे गावोगावी जंगी स्वागत होत आहे. एक उच्चशिक्षित आणि उच्चपदस्थ अधिकारी बीडचा आमदार झाला तर आनंदच होईल अशी भावना यावेळी मतदार व्यक्त करत आहेत. या प्रचारादरम्यान डॉ. ज्योती मेटे यांचे गावोगावी जंगी स्वागत होत आहे.

# लक्ष्मण हाकेंची गाडी फोडली!

## १५० तरुणांनी हल्ला केल्याचा आरोप



नांदेड दि.७ (वृत्तसेवा): विधानसभा निवडणुकीसाठी रणधुमाळी राज्यभरात सुरू आहे. मतदानाची तारीख जवळ येत असतानाच आरोपप्रत्यारोपांनी राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. तर दुसरीकडे नांदेडमधील कंधारमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. कंधार तालुक्यातील पाचोरा गावाजवळ ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्या गाडी फोडण्यात आली आहे. ओबीसी उमेदवाराच्या प्रचाराला जात असताना १५० तरुणांनी आमच्या गाडीवर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याचा आरोपही हाके यांनी केला आहे. ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके हे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मराठवाड्यात आले होते. ते कंधार तालुक्यातील पाचोरा गावातून जात असतानाच त्यांची गाडी फोडल्याची घटना घडली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा नवा वाद पेटण्याची शक्यता आहे. हाके या घटनेनंतर चांगलेच आक्रमक झाले, त्यांनी रस्त्यावरच ठिय्या मांडला. जोपर्यंत हल्लेखोरांना पकडण्यात येत नाही, तोवर येथून हटणार नाही अशी भूमिका ओबीसी बांधवांनी घेतली. याबाबत आंदोलक लक्ष्मण हाके यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, आम्ही ओबीसी उमेदवाराच्या प्रचारार्थ येथे आलो असतानाच आमच्या गाडीवर तोंडावर पांढरे कपडे बांधून दीडशे तरुणांनी हल्ला केला. हा भ्याड हल्ला आहे. यावेळी हल्लेखोरांनी एक मराठा,लाख मराठ अशा घोषणा दिल्याचंही हाकेंनी म्हटलं आहे. उद्या (दि.८) कंधार पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल करणार आहे. पोलिसांनी या घटनेची निःपक्षपातीपणे चौकशी करावी अशी मागणीही त्यांनी केली आहे. तसेच दोषींवर कारवाई करण्यात येत नाही, तोपर्यंत कंधार पोलिस स्टेशनमध्ये ठिय्या मांडणार असल्याचा इशाराही हाके यांनी दिला आहे.

# बीडवासियांच्या झंजावाताचा शुभारंभ; अनिलदादांनी फोडला प्रचाराचा नारळ!

## चारशे गाड्यांचा ताफा घेऊन हजारो कार्यकर्त्यांसह अनिलदादा जगताप बीड मतदार संघातील देवस्थानी नतमस्तक

बीड, प्रतिनिधी- गेल्या चाळीस वर्षांच्या राजकीय प्रवासात निःस्वार्थपणे बीडवासियांची सेवा करत आलेले अनिलदादा जगताप हे केवळ बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार नसून अनिलदादा हा बीडवासियांचा झंजावत आहे आणि याच झंजावाताला प्रारंभ झाला असून अनिलदादा जगताप यांनी माजी राज्यमंत्री प्रा. सुरेशजी नवले आणि आपल्या हजारो सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्र परिवाराच्या चारशे गाड्यांचा ताफा घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून वंदन केले व त्यानंतर नवगण राजुरी येथे गणपतीचे दर्शन घेऊन श्री क्षेत्र नारायण गड येथे श्री नगद नारायणाचे आशीर्वाद घेत त्यांच्या चरणी प्रचाराचा नारळ फोडला आणि आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला. यानंतर बीड मतदार संघातील राजुरी सर्कल, लिंबागणेश सर्कल, पाली सर्कल, खोकरमोहा जि प, नळावंडी सर्कलमधील गावागावातील देवस्थानाचे दर्शन घेतले. दरम्यान गावाखेड्यातील प्रत्येकाने अनिलदादा आणि सुरेश नवले यांचे गावात आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करत अनिलदादांना पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले तर माता-माऊली आणि भगिनींनी अनिलदादा यांचे औक्षण करून त्यांना पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद दिले. यानंतर अनिलदादांनी गौरक्षनाथ टेकडी या देवस्थानी नतमस्तक होऊन महंत नवनाथ महाराजांचा आशीर्वाद घेतला. त्यानंतर बीड शहरातील भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, बस्वेश्वर स्वामी, संत गाडगे बाबा महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, महाराणा प्रताप, माता जिजाऊ यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप आणि प्रा सुरेशजी नवले यांनी ठिकठिकाणी उपस्थित असलेल्या आपल्या समर्थक कार्यकर्त्यांच्या, ग्रामस्थांच्या भेटी घेतल्या व विधानसभा निवडणुकीत आम्हाला मतदान रुपी आशीर्वाद द्या असे आवाहन केले.

- - - -



## क्षीरसागर मुक्त बीड करून विकासाचा कायापालट करण्यासाठी साथ द्या-अनिलदादा जगताप

अनेक वर्ष सत्ता भोगून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या क्षीरसागरांपासून मला बीडची सुटका करायची आहे आणि बीड विकासाचा कायापालाट करायचा आहे. यासाठी माझ्यावर एकदा विश्वास ठेऊन मला साथ द्या. आपल्या अपेक्षेप्रमाणे मी बीडचा विकास करून दाखवेल. आपण मला मतदानरुपी आशीर्वाद दिला तर घरणेशाहीचे मक्तेदारी संपुष्टात येईल आणि सामान्य घरात सत्ता स्थापित होऊन सामान्यांचे मूलभूत प्रश्न सुटतील. असे आवाहन बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांनी बीड मतदार संघातील जनतेला केले.

०००००

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
**लोकआरंभ**
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ८ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



## ||| सण गोपाष्टमी: भ.श्रीकृष्ण आणि गायींना समर्पित |||

(9 नोव्हेंबर- गोपाष्टमी विशेष.)

गोपाष्टमी हा मथुरा, वृंदावन आणि इतर ब्रज प्रदेशातील एक महत्त्वाचा सण आहे. हा सण तेथे मोठ्या प्रमाणात साजरा करतात. हा सण भगवान श्रीकृष्ण आणि गायींना समर्पित आहे. भगवान श्रीकृष्ण आपल्या सर्वांचाच लाडका देव आहे.येथे दिलेली माहिती धार्मिक श्रद्धा आणि लोकश्रद्धेवर आधारित आहे, यासाठी कोणताही शास्त्रीय पुरावा नाही. श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजींनी सर्वसामान्यांचे हित लक्षात घेऊन त्यांच्याच आग्रहास्तव ही माहिती मांडली आहे.... संपादक.

बाळ कृष्णाच्या रंगापासून करामतीपर्यंत सर्वच गोष्टी आपल्याला आवडतात. पण आपणास माहित आहे का? गोपाष्टमी हा मथुरा, वृंदावन आणि इतर ब्रज प्रदेशातील एक महत्त्वाचा सण आहे. हा सण तेथे मोठ्या प्रमाणात साजरा करतात. हा सण भगवान श्रीकृष्ण आणि गायींना समर्पित आहे. या दिवशी भगवान श्रीकृष्णाचे वडील नंद महाराज यांनी वृंदावनातील गायींची काळजी घेण्याची जबाबदारी भगवान श्रीकृष्णांना दिली होती म्हणून हा उत्सव साजरा केला जातो. हिंदू महिन्यातील कार्तिक शुक्ल पक्षातील अष्टमी तिथीला हा शुभ दिवस येतो.

गोपाष्टमीचे महत्त्व- हिंदू मान्यतेनुसार, या दिवशी भगवान श्रीकृष्ण आणि त्यांचा मोठा भाऊ बलराम हे वृंदावनात गायी चारण्यासाठी पहिल्यांदा गेले होते. त्याच प्रमाणे या शुभ सणाशी संबंधित आणखी एक कथा खूप प्रचलित आहे, ती म्हणजे या दिवशी भगवान इंद्राला आपली एक चूक समजली. त्या चुकीसाठी त्यांनी भगवान श्रीकृष्णाकडे क्षमा मागितली. म्हणून सुरभी गाईने भगवान इंद्र आणि भगवान श्रीकृष्ण यांच्यावर दुधाचा वर्षाव केला आणि भगवान श्रीकृष्णांना गायींचा देव गोविंदा म्हणून घोषित केले.

गोपाष्टमी उत्सव- या दिवशी भक्त देवी गाय आणि भगवान श्रीकृष्णाची पूजा करतात आणि निरोगी, समृद्ध आणि उज्ज्वल आयुष्यासाठी त्यांचे आशीर्वाद घेतात. या दिवशी गायींना नवीन वस्त्रे आणि दागिने घालून सजवले जाते आणि भक्त चांगल्या आरोग्यासाठी गायीला विशेष चारा देतात. तसेच, दैनंदिन जीवनात गायींच्या उपयुक्ततेबद्दल तो त्यांना विशेष आदर देतो. या दिवशी दिवसभरात गहू आणि दुधाचे कोणतेही पदार्थ खाणे टाळले जाते.

!! गोपाष्टमी निमित्त सर्व भाविकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!


- संकलन व शब्दांकन - श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजी. रामनगर वॉर्ड, गडचिरोली. फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.

# पोराची लग्न लावून देण्याचे, भर सभेत अजब आश्वासन

--------परळी /प्रतिनिधी:-विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात उमेदवार रोजगार देणार, बेरोजगारी दूर करणार, मतदारसंघाचा विकास करणार, मतदारसंघातन नवीन उद्योगधंदे आणणार, शेतमालाल हमी भाव मिळावा म्हणून प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन देत आहेत. विधासभेचे उमेदवार विकासाचे आश्वासन देत असताना मात्र परळी विधानसभा मतदारसंघात धनजंय मुंडे यांच्या विरोधात लढणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी एके ठिकाणी बोलताना सर्व पोरांची लग्न लालून देण्याचे अजब आश्वासन दिले आहे. आपल्या प्रचारात राजेसाहेब देशमुख म्हणाले, 'तरुण पोरांना विचारतात की नोकरी आहे का ? उद्योगधंदा आहे का? माननीय पालकमंत्र्यांचा उद्योगधंदा , नाही तर तुमचा कुठे चालणार. असं असेल तर एकाही मुलाचे लग्न होणं मुश्किल आहे. पण साऱ्या पोरांना आश्वासन देतो मी - आमदार झालो तर सगळ्या पोरांची लग्न मी लावून देईल. सगळ्या पोरांना कामधंदा देऊ.' राजेसाहेब देशमुख हे काँग्रेसचे - बीड जिल्हाध्यक्ष होते. विधानसभा -निवडणूक लढण्यासाठी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. परळीतूनधनंजय मुंडे यांच्या विरोधात अनेक नावे चर्चेत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली. लोकसभा निवडणुकीत मराठा विरुद्ध ओबीसी असे चित्र निर्माण झाले होते. तसेच काहीसे राजकीय चित्र परळी विधानसभेत धनंजय मुंडे विरुद्ध राजेसाहेब देशमुख यांच्यातील लढतीमुळे निर्माण होण्याची शक्यता आहे.राजेसाहेब देशमुख यांनी आपल्या प्रचारसभेत धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार टीका केली. धनंजय मुंडे मतदारसंघात कुठला उद्योगधंदा आणू शकले नाहीत. तरुणांना रोजगार देऊ शकले नाहीत. जिल्ह्यात फक्त हुकुमशाही सुरू आहे. दिसले त्याला दाबणे आणि दादागिरी सुरू आहे. निष्क्रिय आणि कुचकामी पालकमंत्री जिल्ह्यात आहेत, असा टोला देखील धनंजय मुंडेंना राजेसाहेब देशमुख यांनी लगावला.

## अखेर दिड वर्षापासुन धुळखात पडुन असलेली 200 खाटांची माता व बालसंगोपन ईमारत कार्यान्वित होणार ; जिल्हा शल्य चिकित्सकांच्या सुचना ; सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश:- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.०७ ) सन २०१६-१७ साली जिल्हा रुग्णालयाच्या आवारात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत माता व बाल रुग्णालय उभारण्यासाठी २१ कोटी रुपये निधीची मंजुरी मिळुन तरतूद करण्यात आली होती.मात्र कंत्राटदारांच्या ढिसाळ कारभारामुळे काम वेळेत पूर्ण झाले नाही. त्यानंतर गेल्या दिड वर्षापासुन इमारतीचे काम पूर्ण होऊनही आक्सिजन पाइपलाइन लिफ्ट, विद्युतीकरण, अग्निरोधक यंत्रणा आदी काम अपूर्ण राहिल्याने ईमारत २०० खाटांची ईमारत धुळ्यात पडुन होती. याचवेळी जिल्हा रुग्णालयाच्या जुन्या अपु-या कोंदट व ईमारतीत उपचारांमुळे महिलांची हेळसांड होत होती. त्यामुळे तातडीने काम पूर्ण करण्यात यावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली सहका-यांनी वर्षभरापासून निवेदन तसेच आंदोलनाच्या माध्यमातून पाठपुरावा केला.तत्कालिन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ -मुंडे यांनी आंदोलनाची दखल घेत जिल्हा रुग्णालयात प्रत्यक्ष ईमारतीची पाहणी करत जिल्हा वार्षिक नियोजन निधीतून ३ कोटी रूपयांची तरतूद केली होती. वर्षभरापासून तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुरेश साबळे, डॉ.अशोक बडे आणि विद्यमान जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर अखेर दि.०६ बुधवार रोजी डॉ.अशोक



थोरात यांनी पाहणी करून रुग्णालय सुरू करण्याबाबतच्या तांत्रिक बाबींच्या सुचना आधिका-यांना दिल्या असुन दहा दिवसांत कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे सांगितले. अखेर सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असुन महिलांची हेळसांड थांबणार आहे.

सविस्तर माहितीस्तव

१५ आगस्ट पासुन महाराष्ट्र शासनाने आरोग्य सेवा मोफत करण्याचा निर्णय घेतला तेव्हापासून बीड जिल्हा रुग्णालयातील आंतररूग्ण आणि बाह्यरुग्ण संख्येत कमालीची वाढ झाली असुन बीड जिल्हा रुग्णालयाची आंतररुग्ण क्षमता ३२० आहे तर दररोज ४०० -५००च्या आसपास रूग्ण उपचारासाठी येतात.वाढत्या रुग्ण संख्येमुळे जिल्हा रुग्णालयाच्या अपु-या , कोंदट वातावरण असलेल्या जुन्या ईमारतीत गर्दी होत असुन जिल्हा रुग्णालयातील स्त्रीरोग विभागात खाटा अपु-या पडत असुन यामुळे नवजात बालके व नवमातांची



तारांबळ उडत असल्याचे शेजारील २०० खाटांची सोय असलेल्या दिड वर्षापासुन धुळखात पडुन असलेल्या माता व बाल रुग्णालयाची ईमारत कार्यान्वित केल्यास रूग्णांची अडचण दुर होऊ शकते यासाठी डॉ.गणेश ढवळे व सहका-यांनी पाठपुरावा वर्षभरापासून केला होता.अखेर लवकरच ईमारत कार्यान्वित होणार आहे. आणि महिलांची हेळसांड थांबणार आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ -मुंडे यांनी आंदोलनाची दखल घेत ३ कोटी रुपये निधी मंजूर केला होता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा रुग्णालयात महिला व बालरुग्णांसाठी २१ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेली २०० खाटांची ईमारत निधी अभावी धुळखात पडुन असुन जिल्हा वार्षिक नियोजन निधीतून तातडीने निधी देण्यात यावा यासाठी दि.५ फेब्रुवारी रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्हा कार्यालयासमोर धरणे आंदोलन केल्यानंतर त्याच दिवशी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ - मुंडे यांनी जिल्हा रुग्णालयात प्रत्यक्ष भेट देत ईमारतीची पाहणी करून आक्सिजन पाइपलाइन, विद्युतीकरण,अग्निरोधक यंत्रणा यासाठी ३ कोटी रूपयांचा निधी जिल्हा वार्षिक योजना निधीतून मंजूर केला होता.ईमारतीची पाहणी करताना तत्कालीन अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नागेश चव्हाण, डॉ.हनुमंत पारखे उपस्थित होते.

डॉ.अशोक थोरात यांनी ईमारत कार्यान्वित करण्यासाठी तांत्रिक बाबींच्या सुचना दिल्या माता व बाल रूग्णालयाची ईमारत कार्यान्वित करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केल्यानंतर काल दि.६ बुधवार रोजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी नव्या ईमारतीची पाहणी करून रूग्णालय सुरू करण्याबाबतच्या तांत्रिक सुचना आधिका- यांना दिल्या असुन यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संतोष शहाणे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.एल.आर तांदळे,नोडल अधिकारी डॉ.हनुमंत पारखे उपस्थित होते.सध्या प्रसुती,सिझेरीयनमध्ये जिल्हा रुग्णालय अव्वल नंबर असुन नव्या इमारतीमध्ये महिला व बालकांसाठी स्वतंत्र रूग्णालय सुरू झाल्यानंतर आणखी रूग्ण सेवा आधिक प्रभावी होणार असुन सर्व तयारी अंतिम टप्प्यात असुन साधारणतः १० दिवसात ईमारत कार्यान्वित होणार असल्याचे डॉ.अशोक थोरात यांनी सांगितले.

## बीड मतदारसंघात मागील पाच वर्षात विकासकामे झाले नाहीत- डॉ. योगेश क्षीरसागर

शिरूर कासार (प्रतिनिधी) दि.७ : महायुतीचे बीड विधानसभेचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी मतदारसंघात प्रचाराचा झंझावात सुरू केला असून शिरूर कासार तालुक्यात गुरुवारी (दि.७) प्रचार दौरा केला. दौऱ्यात डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघात मागील पाच वर्षात विकासकामे झाली नाहीत. हा विकासाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी आपण प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही महायुतीचे बीड विधानसभेचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी दिली. शिरूर कासार तालुक्यात सकाळी ७ वाजल्यापासून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचाराचा झंझावात सुरू झाला होता. दुपारपर्यंत फुलसांगवी, मार्कंडवाडी, हाजीपुर, गाजीपुर,जांब, शिरापूर गात,



पौंडूळ क्र.३, कमलेश्वर धानोरा, आर्वी, लिंबा खांबा, खलापुरी, नगरेवाडी, तागडगाव, हिवरसिंगा, रायमोहा व आजूबाजूच्या वाड्यावर जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधत येत्या २० तारखेला मला मतदान करून आपले प्रश्न मार्गी लावण्यासाठी विधानसभेत पाठवावे, असे आवाहन केले. त्यांच्या दौऱ्यास मतदारसंघात मोठा प्रतिसाद पहावयास मिळत आहे. शिरूर कासार तालुक्यातील प्रचाराची सुरुवात फुलसांगवी येथून झाली. फुलसांगवी येथे संत वामनभाऊ महाराज यांच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. यावेळी गावकऱ्यांशी संवाद साधताना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे प्रश्न, समस्या जाणून घेतल्या. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर गावातील नागरिकांशी संवाद साधताना म्हणाले की, लोकांच्या मागण्या पूर्ण करू. सर्व समजातील घटकाला सोबत घेऊन विकासकामे करायचे आहेत. मागील पाच वर्षात कामे झाली नाहीत, ते सर्व कामे येणाऱ्या पाच वर्षात पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. भ्रष्टाचार रोखण्यासाठी प्रयत्न करणार आहे. बीड शहराप्रमाणे ग्रामीण भागात देखील दर्जेदार कामे करायची आहेत. आपल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नसल्याचे देखील डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

### आमदार पुन्हा गावात आलेच नाहीत!

आमदार संदीप क्षीरसागर हे निवडून आल्यानंतर आमच्या गावात आलेच नाहीत, त्यांनी पुन्हा तोंड दाखविले नाही. दिलेली आश्वासने पाळली नाहीत. त्यामुळे आता त्यांना गावात आल्यास जाब विचारणार असल्याच्या संतप्त भावना अनेक गावातील ग्रामस्थांनी व्यक्त केल्या. दरम्यान, शिरूर कासार तालुक्यातील जनतेवर अशा प्रकारे आपल्याकडून कधीही अन्याय होणार नाही, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ग्रामस्थांना दिला.

### काँग्रेसच्या पदाधिकाऱ्याचा जाहीर प्रवेश

रायमोह परिसरातील तागडगावचे काँग्रेस नेते विलास बबन ढाकणे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश झाला. त्यांच्यासह इतर सहकाऱ्यांचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी स्वागत केले.

# चित्रलेखा पाटील या महाविकास आघाडीच्या उमेदवार, यांनाच निवडून द्या ; जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांचे आवाहन

अलिबाग : महाविकास आघाडी एकत्रितपणे निवडणुका लढणार आहेत. ही स्पष्ट भूमिका आहे. महाविकास आघाडीमध्ये आज उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व, चेहरा संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय आहे. शिवसैनिकांच्या या भावना आहेत, जनतेच्या भावना आहेत की, आगामी काळात विधानसभेसाठी मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे असावेत. ज्या पद्धतीने गद्दारांनी गद्दारी करून सत्ता हिसकावली, त्यामुळे गद्दारांना धडा शिकवायचा असेल तर उद्धव ठाकरे पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत, ही आमची भावना आहे, असे शिवसेना ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी म्हटले आहे.

महाविकास आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची दि.६ नोव्हेंबर रोजी अलिबाग हॉटेल बिग स्पल्याश येथे बैठक झाली. बैठकीत जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, उपजिल्हा प्रमुख प्रशांत मिसाळ, जिल्हा सल्लागार सतीश पाटील, रोहा तालुका प्रमुख समीर शेडगे, युवासेना जिल्हाअधिकारी अमीर ठाकूर, कैलास गजने, प्रमोद भायदे, अलिबाग तालुका संघटक हेमंत



पाटील, अलिबाग तालुका संपर्क प्रमुख उपकार खोत, महिला आघाडी उपजिल्हा संघटिका सौ.दर्शना पाटील, जिल्हा सहसंपर्क संघटिका सौ.शिल्पा घरत, शहर संघटिका सौ.राखी खरवले व शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या आदेशानुसार, शेकापचे नेते जयंत पाटील यांच्या सन्मानार्थ सर्व शिवसैनिकांना आदेश दिले आहेत की महाविकास आघाडीच्या उमेदवार सौ. चित्रलेखा पाटील यांना बहुमतांनी विजयी करायचं आहे. मातोश्रीवरून आलेला आदेश आमच्यासाठी अंतिम आहे त्यामुळे पुढील पंधरा दिवस आमचा प्रतेक शिवसैनिक तुमच्यासोबत अगदी तन-मन-धन अर्पण करून काम करेल. हीच महाविकास आघाडी येणाऱ्या जिल्हापरिषद, पंचायत समिती आणि सर्व निवडणुका मध्ये सोबत असेल तर गद्दार व महायुती टिकुच शकणार नाही. त्यामुळे मी तुम्हाला शब्द देतो की शिवसैनिक १००% मतदान महाविकास आघाडीच्या उमेदवारालाच करेल असे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी सांगितले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ८ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# शासनाकडे वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळे ज्येष्ठ नागरिकांचे अनेक प्रश्न मार्गी लागले-टेकाळे

## संत ज्ञानेश्वर बालकाश्रम कळंब येथे आयोजित ९० वर्षापुढील ज्येष्ठ नागरिक सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

कळंब दि.७ (प्रतिनिधी): ज्येष्ठ नागरिक महासंघ फेसकॉम संघटनेच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नासाठी शासनाकडे सतत पाठपुरावा केल्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागले आहे . यामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या वृद्धापकाळ पेन्शन मध्ये वाढ, ज्येष्ठासाठी विरूंगळा, आरोग्य विषयक सवलती, रेल्वे प्रवासात सवलत यांचा समावेश आहे. याचबरोबर ज्येष्ठ नागरिकांना उरलेल्या आयुष्यात एकाकीपणा येऊ नये व त्यानां आनंदी राहत आहे म्हणून संघटनेच्या माध्यमातून अनेक उपक्रम घेतले जात आहेत असे सांगितले संत ज्ञानेश्वर बालकाश्रम कळंब येथे आयोजित ९० वर्षापुढील ज्येष्ठ नागरिक सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दक्षिण मराठवाडा प्रदेश माजी अध्यक्ष डॉ .बी .आर. पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून दक्षिण मराठवाडा प्रदेशाध्यक्ष प्राचार्य दामोधर थोरात ,सचिव जगदीश जाजू ,ज्येष्ठ पत्रकार अनंत अडसूळ सेवानिवृत्त उप पोलीस अधीक्षक शिवाजीराव टेकाळे ,कापूस पणन मंडळाचे माजी संचालक भागवतराव धस यांची उपस्थिती होती याप्रसंगी तेरे येथील राजाभाऊ आंधळे, सिद्राम सलगर यांनी अण्णासाहेब टेकाळे याना संत शिरोमणी गोरोबा काका यांची प्रतिमा भेट दिली कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक नागोराव भंडारे ,बशीर पठाण, गुलाब बागवान ,दौलताबी शेख यांचा शाल ,श्रीफळ, पुष्पहार देऊन अण्णासाहेब टेकाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला याप्रसंगी विशेष कार्याबद्दल ज्येष्ठ नागरिक महासंघाचे कळंब तालुका उपाध्यक्ष अड, त्रिंबकराव मनगिरे, तालुका कार्याध्यक्ष डॉ. माणिकराव डिकले. अनंत घोगरे ,यांचा सत्कार करण्यात आला



प्राचार्य दामोधर थोरात यांनी आपल्या भाषणात ज्येष्ठ नाग.रक महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे कळंब तालुक्यातील वाठवडा गावातील असून हा तालुक्याचा बहुमान आहे असे सांगितले कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी.आर पाटील यांनी ज्येष्ठ नागरिकांना संघटना ही ज्येष्ठांसाठी आधार व विश्वास आहे त्यांना सुख दुःखात एकत्र येता आल पाहिजे असे सांगितले व धाराशिव जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी कै. डी .के कुलकर्णी यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी शेवटचा श्वास असेपर्यंत कार्य केले याची आठवण सांगितली कार्यक्रमाचे प्रास्ताविक अड, त्र्यंबकराव मनगिरे यांनी सूत्रसंचालन माधवसिंग राजपूत यांनी व आभार महादेव महाराज अडसूळ यांनी मानले. याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक महासंघ जिल्हा समन्वय समिती उपाध्यक्ष अच्युतराव माने , राजाभाऊ आंधळे, कल्याण खापे, नवनाथ भंडारे, बापू भंडारे, शिवाजी शिंदे, लालासाहेब माळी यांची उपस्थिती होती

## संजय घरत यांची ग्रुप ग्रामपंचायत विंधणे आठ गाव भाजप अध्यक्ष पदी निवड

उरण: (सुनिल,ठाकूर ): विंधणे ग्रुप ग्रामपंचायत मधील धाकटी जुई येथील कार्यकर्ते संजय नारायण घरत यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्या वर विंधणे ग्रामपंचायत मधील येणारी आठ गावाची जबाबदारी भाजपने दिली असून या गुप ग्रामपंचायत विंधणे आठ गाव अध्यक्ष पदी त्यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी प्रसाद (गंपू शेठ ), पाटील, अजित पाटील (वेश्वी ), रघुनाथ पाटील (कंठवली ), अशोक पाटील (कंठवली ), दिपक ठाकूर (खालचा पाडा ), शैलेश गावंड (ग्रामपंचायत सदस्य ),मनोहर जोशी (टाकी गाव ),प्रकाश घरत, आकाश घरत, ओमकार घरत, तुषार घरत, सागर घरत, राम घरत आदी उपस्थित होते, संजय घरत यांची भाजप आठ गाव अध्यक्ष पदी निवड झाल्या बद्दल त्यांच्या वर विविध स्थरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




## दिशा वेल्फेअर ग्रुपची दिव्यांग,अनाथ,निराधार मुलांसाठी दिवाळी

मुंबई :ठाणे-मुंबई सामाजिक संस्था रजि. दीपावली इव्हेंट २०२४ वर्ष १० वे दरवर्षी संस्थेची दिवाळी दिव्यांग, अनाथ, निराधार मुलांसोबत साजरी करण्यात येते. यावर्षी बुधवार दिनांक ०६ नोव्हेंबर२०२४ रोजी खडवली(प) येथील पसायदान बालविकास फाउंडेशन-अनाथालय आणि मातोश्री व्रध्दाश्रम सोबत संस्थेची दीपावली साजरी करण्यात आली. याप्रसंगी अनाथालयाला २×२ दुमजली पलंग (Bunk beds),मुलांना ५नित्योपयोगी वस्तू संच,घरगुती दिवाळी फराळ, चॉकलेट,बिस्कीट, खेळणी व फटाके वाटप करण्यात आले. तर मातोश्री व्रध्दाश्रमात १०९ ज्येष्ठांना दिवाळी प्रीती भोजन देण्यात आले. पसायदान संस्थेचे श्री. बबन शिंदे यांनी संस्थेबद्दल सविस्तर माहिती सांगितली. दिशा ग्रुपतर्फे अध्यक्ष दिनेश बैरीशेट्टी व सचिव प्रकाश पालव यांची भाषणे झाली. संस्थेच्या हितचिंतक व देणगीदार ज्योती पालव यांनी ज्येष्ठांचा सहवास तसेच आशीर्वाद अनमोल असल्याचे आपल्या भाषणात सांगितले. मुलांनी टाळ्यांच्या जल्लोषात उपस्थितांचे स्वागत केले.व पसायदानाने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले तर ज्येष्ठांनी दोन्ही हात वर करुन संस्थेच्या कार्याला सलाम करून भरभरून आशीर्वाद दिले. संस्थेचे हितचिंतक, देणगीदार योगेशा प्रॉपर्टी कन्सलटन्सीचे योगेश, उमेश,पद्मीनी अहिरे उपक्रमात सहभागी झाले होते. आवाज इंडिया व्हाइस मिडीयाचे विनोद कांबळे यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली.
हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. सुरेश पांचाळ,भगवान कुर्ले , नीळकंठ आंबुकर,रवींद्र वाघमारे, दर्शना राणे इ. सभासदांनी विशेष मेहनत घेतली.

## दिवा पश्चिमेतील समितीच्या मालमत्ता कर विभागातील दुरावस्था.

ठाणे, दिवा ता ७ नोव्हे : दिवा पश्चिमेतील ठाणे महानगर पालिकेच्या दिवा प्रभाग समितीच्या मालमत्ता कर विभागातील इमारती मधील रूमची दुरावस्था उघडकीस आली आहे. दिवा शहरातील मालमत्ता कर विभाग कोटींच्या घरात कर जमा केला जातो त्याच इमारतीत अधिकारी, कर्मचारी तसेच मालमत्ता कर ग्राहक ये-जा करत असतात सदर कार्यालयातील दुरावस्थेमुळे कर्मचाऱ्यांना आपला जीव मुठीत ठेऊन काम करावे लागत आहे. मालमत्ता कर विभागाची अनेक महत्वाची कागदपत्रे व फाईल असणाऱ्या रूम मधील पोटमाळा धोकादायक स्थितीत असून त्याला कश्या प्रकारे आधार देण्यात आला असल्याचे निदर्शनास आल्याने एडवोकेट रविराज बोटले यांनी निदर्शनास आणून दिले आहे. प्रकरणी दिवा प्रभाग समितीच्या मालमत्ता कर विभागातील इमारती मधील रूमची दुरावस्था तात्काळ दूर करण्यासाठी व मालमत्ता कर विभागातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी दिवा प्रभाग समितीच्या मुख्य कार्यालयातील सहायक आयुक्त यांना एखादी दुर्दैवी दुर्घटना घडू नये म्हणून कार्यालयात संरचनात्मक सर्वेक्षण करून उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



## बार्टी कडून विद्यार्थी दिवस मोठ्या उत्साहात साजरा


कौठा : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समतादूत मिलिंद आळणे गुरुनाथ गाडेकर सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्प पूजन करण्यात आले अध्यक्षस्थानी नाथाजी मोरे हे होते 7 नोव्हेंबर. आजचा दिवस हा संपूर्ण महाराष्ट्रात विद्यार्थी दिवस (Student Day) म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मुख्यत्वे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ म्हणून साजरा केला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शैक्षणिक वाटचाल खूपच रोमहर्षक आहे. हुशार, कुशाग्र बुद्धिमत्ता यांसारख्या अनेक पैलूंमधून आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वर्णन करतो. आंबेडकरांना स्वत: देखील आजन्म विद्यार्थी मानले. म्हणूनच शासनाने त्यांच्या शाळा प्रवेश दिनाला विद्यार्थी दिन म्हणून घोषित केले. यावेळी बंडू गायकवाड,उत्तम मोरे, कोंडवा मोरे ,पिराजी गायकवाड आभार प्रदर्शन सयाजी गायकवाड यांनी केले यावेळी मोठ्या संख्येने उपासक उपासिका उपस्थित होत्या



# काँग्रेसविरोधात खोट्या जाहिराती प्रसिद्ध करणा-या भाजपावर तात्काळ कारवाई करा,

## काँग्रेस शिष्टमंडळाची भाजपाविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार.

मुंबई, दि. ७ नोव्हेंबर २०२४ काँग्रेस पक्षाने कर्नाटक, तेलंगणा विधानसभेवेळी दिलेल्या गॅरंटींची अंमलबजावणी केली जात नाही अशा पद्धतीच्या खोट्या व जनतेची दिशाभूल करणाऱ्या जाहिराती भारतीय जनता पक्षाने विविध वर्तमानपत्रात मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध केल्या आहेत. वास्तविक पाहता काँग्रेसने कर्नाटक व तेलंगणा राज्यात गॅरंटी लागू केलेल्या आहेत असे असतानाही भाजपाने जाणीवपूर्वक काँग्रेसविरोधात अपप्रचार केल्याने भाजपावर तात्काळ कारवाई करावी तसेच त्यांच्यावर एफआयआरही दाखल करावा, अशी मागणी केल्याचे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या



मीडिया व पब्लिसिटी विभागाचे चेअरमन पवन खेरा यांनी सांगितले. काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आज राज्याच्या मुख्य निवडणूक अधिका-याची भेट घेऊन भाजपा विरोधात लेखी तक्रार केली. यावेळी पवन खेरा यांच्यासोबत प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, महाराष्ट्राचे मीडिया प्रभारी सुरेंद्र राजपूत, चयनिका उनियाल, सचिन सावंत, चरणजित सप्रा, विधी विभागाचे प्रदेशाध्यक्ष ॲड रवी जाधव आदी उपस्थित होते. त्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना पवन खेरा म्हणाले की, महाराष्ट्रातील प्रमुख वर्तमानपत्रात पहिल्या पानावर भाजपाने काँग्रेसविरोधात खोट्या जाहिराती प्रसिद्ध केल्या आहेत. काँग्रेस पक्षाने गॅरंटी लागू केल्या नाहीत असा अपप्रचार करण्यात आला आहे. निवडणूक आयोग काँग्रेसच्या तक्रारीची दखल घेऊन भाजपावर तात्काळ कारवाई करेल अशी अपेक्षा आहे असे पवन खेरा म्हणाले लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेत १३३ कट्टरपंथीय संघटना होत्या या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आरोपाला उत्तर देताना अतुल लोंढे म्हणाले की, निवडणुकीत पराभव होत असल्याचे दिसू लागतात असे अहवाल बाहेर काढले जातात. दलित, आदिवासी, गरिब, महिला, शेतकरी व युवकांचे प्रश्न उपस्थित होताच अशा प्रकारे सणसणाटी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. लोकसभा निवडणुकीच्या वेळीही पंतप्रधानांना मारण्याची धमकी आल्याचे सांगितले होते पण तो मेल हॅक करून पाठवण्यात आल्याचे नंतर उघड झाले. भाजपाला पराभव दिसू लागला आहे, देवेंद्र फडणवीससुद्धा निवडणूक हरत आहेत, त्यामुळे मानसिक संतुलन बिघडले असावे. काल राहुल गांधींबद्दल शहर नक्षलवाद्यांचे विधान केल्यानंतर हा अहवाल पुढे केला जात आहे, असेही अतुल लोंढे म्हणाले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ८ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# शरद पवारांचा बीडला मुक्काम

## जिल्ह्यातील राजकारणाची दिशा बदलणार!

बीड दि.७ (बातमीदार): राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या बीड जिल्ह्यात शनिवारी तीन सभा आयोजित करण्यात आल्या आहेत. आष्टी, परळी आणि त्यानंतर सायंकाळी सात वाजता बीड येथे जाहीर सभा होणार आहे. त्यानंतर पवार हे बीडला मुक्काम करणार आहेत. पवारांच्या मुक्कामात बीड जिल्ह्यातील राजकारणाची दिशा बदलते असा इतिहास आहे. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशीच लढत सध्या तारीख राज्यात दिसत आहे. सर्वच नेत्यांच्या प्रचाराचा धडाका सुरु झाला आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मराठवाड्यात पवार हे शनिवारपासून सभाचा धुरळा उडवणार आहेत. शनिवारी त्यांच्या आष्टी, परळी आणि बीड येथे सभा होणार आहेत. यातील बीडची सभा सायंकाळी सात वाजता छत्रपती संभाजी महाराज स्टेडियम येथे होणार आहे. बीडचे आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ ही सभा होणार आहे. या सभेनंतर पवार हे बीड येथे मुक्काम करणार आहेत. निवडणूक काळात पवार बीडला मुक्काम करतात हा आजवरचा इतिहास आहे. त्यांच्या मुक्कामानंतर ते जिल्ह्याच्या राजकारणाची दिशा बदलतात हे देखील सर्वश्रुत आहे. पवार शनिवारी बीड येथे मुक्कामी असल्याने १९८६ च्या इतिहासाची पुनरावृत्ती होऊन सर्व जागा पवार निवडून आणण्यासाठी काय रणनीती आखणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भाजपच्या नाकावर टिच्चून नवाब मलिक यांना एबी फॉर्म दिला

मुंबई : भारतीय जनता पार्टीचा विशेषता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रचंड दबाव आणि कडाडून विरोध असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने नवाब मलिक यांना एबी फॉर्म दिला आणि सना मलिक यांच्या निवडणूक प्रचारार्थ आयोजित पदयात्रेत अजित पवार सहभागी झाले. अजित भाजपाच्या दबावाला अजिबात बळी पडले नाहीत.

अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी नवाब मलिक यांना देऊ नये यासाठी भारतीय जनता पक्षाने प्रचंड दबाव आणला होता. मलिक यांच्यावर गंभीर आरोप असल्याने त्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवू नये, आमचा त्यांना विरोध असेल, अशी भूमिका भाजपने निवडणूकीपूर्वी जाहीर केलेली होती. परंतु भाजपचा आणि विशेषत: देवेंद्र फडणवीस यांचा विरोध डावलून अजित पवार यांनी नवाब मलिक यांना पद्धतशीरपणे शेवटच्या क्षणाला तिकीट देऊन एबी फॉर्म दिला. नवाब मलिक यांच्या उमेदवारीने बॅकफूटला गेलेल्या भाजपने नंतर ते जरी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार असले तरी आम्ही त्यांचा प्रचार करणार नाही. आम्ही शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराचा प्रचार करू, अशी भूमिका घेतली. मात्र गुरूवारी थेट राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच मलिक यांच्या प्रचारासाठी रॅलीला उपस्थित राहून पुन्हा भाजपला आव्हान दिले.

अणुशक्ती नगर मतदार संघाच्या राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवार सना मलिक आणि मानखुर्द गोवंडीचे उमेदवार नवाब मलिक यांच्या प्रचारार्थ अजित पवार आज गोवंडी टाटा नगर परिसरातून रॅली करत आहे. नवाब मलिक यांच्या उमेदवारीला घेऊन युतीमध्ये जोरदार विरोध होता. तरी नवाब मलिक यांना पक्षाने उमेदवारी दिली आहे. त्यात आता खुद्द अजित पवार हेच प्रचारात उतरल्यामुळे युतीत नाराजी होण्याची शक्यता बळावली आहे. या दरम्यान नवाब मलिक यांच्यावर गंभीर आरोप असल्याने आमचा त्यांना पाठिंबा नाही, हे आम्ही याआधीच जाहीर केले आहे. सना मलिक महायुतीच्या उमेदवार असल्याने त्यांचा प्रचार करण्यात काही गैर नाही. नवाब मलिकांना आमचा पाठिंबा नाही, हे आम्ही कित्येक वेळा सांगितले आहे. सना मलिक महायुतीच्या उमेदवार असतील तर त्यांना समर्थन देणे आमचे काम आहे, असे भाजपच्या वतीने प्रवीण दरेकर यांनी सांगितले. तसेच या गोष्टीमुळे आमच्या युतीत बाधा येणार नसल्याचेही दरेकर म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून अणुशक्तीनगर विधानसभा मतदारसंघातून सना मलिक निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यांच्या विरोधात शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून अभिनेत्री स्वरा भास्कर यांचे पती फहाद अहमद निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यांनीही अणुशक्तीनगर मध्ये जोरदार प्रचार सुरू केला आहे.
---
००---



ठाणे - दिव्यात उत्तर भारतीय समाज आयोजित छटपूजा मोहत्सव दातीवली तलाव येथे आयोजित करण्यात आला होता. प्रसंगी हजारो महिलांनी दातीवली तलाव येथे येऊन छट पूजा मनोभावे साजरी केली. (फोटो - संतोष पडवळ )



अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्था
सूर्यकांत पाटील
संस्थापक - अध्यक्ष
E-mail: abasspen17@gmail.com
दि.४/११/२०२४
सूर्यकांत पाटील
राष्ट्रीय अध्यक्ष
Email-abasspen17@gmail.com

# महेश बालदी यांनी आगरी समाजाची माफी मागावी, अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेची मागणी

उरण दि ७(विठ्ठल ममताबादे ) अनेक विधानांतून महेश बालदी यांनी आगरी समाजाचा घोर अपमान केला आहे. याबद्दल बालदी यांनी समाजाची जाहीर माफी मागावी. समाजाबद्दलचे असे अनुद्गार यापुढे आम्ही कदापि खपवून घेणार नसल्याचा इशारा अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेने पत्राद्वारे महेश बालदी याना दिला आहे. यापूर्वी अखिल आगरी समाज परिषद यांनी देखील महेश बालदी यांनी आगरी समाजाची माफी मागावी अशी मागणी केली होती.

अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेने पत्राद्वारे आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे की, काही लोकांच्या आशिर्वादाने सत्तेच्या आणि पैशाच्या जोरावर आतापर्यंत आगरी समाजाबद्दल जी विधाने केलीत, त्यांतून आगरी समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. ज्या आगरी समाजाने तुम्हाला डोक्यावर घेतले, त्यानांच कमी लेखण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न तुम्ही वारंवार केला आहात. “ही काही आगरी समाजाच्या संघटनेची निवडणूक नाही.” या विधानातून तुमचा समाजाला एकप्रकारे कस्पटासमान लेखण्याचा इरादा दिसून आला आहे. अशा प्रकारे सभ्यतेच्या साऱ्या मर्यादा महेश बालदी यांच्याकडून तोडल्या गेल्या आहेत. याचा समस्त आगरी समाज जाहीर निषेध करीत आहे. बालदी यांच्याकडून ही गोष्ट पहिल्यांदाच अनवधानाने घडलेली आहे, असेही म्हणता येणार नाही. बालदी हे आगरी समाजाला तुच्छतेच्या भावनेने पहात असल्याचेच त्यांच्या देहबोलीतून आतापर्यंत दिसून आले आहे.

यापूर्वी महेश बालदी यांनी माझी जात बघायला, तुम्ही मला मत देणार आहात की मुलगी” अशी वायफळ बडबड करुन येथील माता-भगिनींचा अपमान केला आहे. आमच्या आयाबहिणी काही रस्त्यावर पडलेल्या नाहीत. हे आपण ध्यानात घ्यावे. असा सूचक इशारा अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेने दिला आहे. एकीकडे स्थानिक भूमिपुत्र नवी मुंबई विमानतळास लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी करीत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने देखील केली, आणि दुसरीकडे मात्र या विमानतळाचा उल्लेख जाणीवपूर्वक “आदाणी विमानतळ” असा करुन बालदी यांनी स्थानिकांच्या, प्रकल्पग्रस्तांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. अशा प्रकारे अनेक विधानांतून महेश बालदी यांनी आगरी समाजाचा घोर अपमान केला आहे. याबद्दल बालदी यांनी समाजाची जाहीर माफी मागावी. समाजाबद्दलचे असे अनुद्गार यापुढे आम्ही कदापि खपवून घेणार नसल्याचे अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेने मागणी केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com